INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर: कृषी विषयक विचार आणि कार्य

## (Dr. B. R. Ambedkar: Thought and Function on Agriculture)

**प्रा.डॉ सुरेश रामरावजी सोमकुंवर**
समाजशास्त्र विभागप्रमुख
विद्यासागर कला महाविद्यालय खैरी (बिजेवाडा).
रामटेक. जी. नागपूर
E-mail: sureshrsomkuwar@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/04.2022-27513177/IRJHIS2204024

**प्रस्तावना :**

मानव जीवन जगण्यासाठी सुरूवातीपासून कोणत्या ना कोणत्या क्रिया करीत आला. या प्रयत्नामधुनच अन्नधान्य संकलन अवस्थेपासुन ते आजची आधूनिक अर्थव्यवस्था विकसीत झाली. विकासाच्या कोणत्यातरी अवस्थेमध्ये मानवाला शेतीचा शोध लागला. मानव सुरूवातीला स्थलांतरीत स्वरूपाची शेती करू लागला. व कालंतराने तो स्थिर स्वरूपाच्या शेती करू लागला. ज्यामुळे मानवी समाजात अनेक बदल झालेत. कालपर्यत भटक्या अवस्थेमध्ये जीवन जगणारा मानव हळूहळू स्थिर होवू लागला. गावांची निर्मीती व इतर संस्थेच्या विकासाबरोबरच समाजात शेती हा अर्थव्यवस्थेचा कणा बणू लागला. वर्तमान काळात देखिल उत्पादनाचे प्राथमिक स्त्रोत म्हणून शेती मानले जाते. औद्योगिक क्षेत्राला लागणारा कच्चा माल आणि इतर बाबीचा पुरवठा करण्याची महत्वाची जबाबदारी शेती उद्योगावर आहे.

भारतात शेती मुख्य व्यवसाय आहे. भारतातील काही विशिष्ट समुहाजवळ शेती आहे तर काही लोक अल्पभूधारक, भूमीहीन शेतमजुर म्हणून जीवन जगत आहे. एक अर्थतज्ञ म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यानी शेती विषयक काही अभ्यासपूर्ण विचार मांडलेले आहे व शेती विकासाकरीता काही कार्य देखिल केलेली आहे.

**शोधनिबंधाची उदिष्टये** :

प्रस्तुत शोधनिबंधाची पूढील उदिष्टये निश्चित करण्यात आलेली आहे.

अ. बाबासाहेब आंबेडकर यानी भारतीय शेती विषयक मांडलेली विचार समजून घेणे

ब. बाबासाहेबांनी मांडलेल्या शेतीविषयक प्रश्नांना समजून घेणे

क. बाबासाहेबांनी शेतीच्या प्रश्नांबाबत सूचविलेले उपाय आणि केलेले कार्यांना समजून घेणे.

**पध्दतीशास्त्र :**

प्रस्तुत संशोधाकरिता वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला असुन बाबासाहेबांचे विचार आणि कार्य समजून घेण्याकरीता दुय्यम स्त्रोतांचा अवलंब करण्यात आलेला आहे. बाबासाहेबांनी लिहलेल्या ग्रंथांचा त्यांनी केलेल्या कार्याचा वेगवेगळया मासिक, वर्तमानपत्रे आणि नियतकालीके तसेच संशोधन पेपर इत्यादीच्या माध्यमातुन प्राप्त झालेल्या माहितीचा प्रस्तुत शोधनिबंधामध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी विषयक विचार:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक दर्जाचे अर्थतज्ञ होते. डॉक्टरेट इन इकॉनॉमिक्स करीता कोलांबिया युनिर्व्हसिटी आणि लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स येथे आपले प्रबंध सादर केले होते. त्यांच्या आर्थिक विचारात भारतातील ग्रामिण अर्थव्यवस्थेचे निरीक्षण देखिल अर्तभूत आहे. भारत हा खेडयांचा देश आहे या देशातील बहुतांश लोकांचा व्यवसाय शेती आहे. लोक आपल्या उदरनिर्वाहाचे साधन म्हणून या व्यवसायाकडे पाहत होते. देशात शेतीव्यवसाय संदर्भातील प्रथा परंपरा विकसित झालेल्या आपणास पाहावयास मिळतात.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे या बाबातील निरिक्षण वेगळे होते त्यानी शेती व्यवसायाचा संबंध समाजव्यवस्थेशी जोडला होता. ग्रमिण भागातिल जाती आधारित समाजव्यवस्थेचे कारण त्यांनी ग्रामिण अर्थव्यवस्थेत शोधले. भारतीय समाजातील असमानतेचे मुलभूत कारण जमीन आहे. काही उच्च जातीचे लोक हे प्राचीन काळापासून जमीनीचे मालक राहलेले आहे. काही मध्यमवर्गीय लोक हे आपले पारंपारीक व्यवसाय करीत तर समाजाच्या खालच्या जाती हया भूमीहीन शेतमजूर आहेत. शेतीमुळे ग्रामिण भागामध्ये आर्थिक विषमता मोठया प्रमाणावर आहे. ही आर्थिक विषमता जातीव्यवस्थेला पूरक ठरते आर्थिक विषमता जितकी कमी होईल तीतकी जातीय भेदभावाची दरी कमी होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शेती हे केवळ उपजीवीकेचे साधन आहे या विचाराला विरोध करतात. ते म्हणतात की शेती ही केवळ उदरनिर्वाहाचे साधन नाही तर ते राष्ट्रीय उत्पादनाचा प्रमुख स्त्रोत आहे. शेती हा ग्रामिण भागाच्या आर्थिक विकासाचा केन्द्रबिंदू आहे. शेती शेतकऱ्यासह ग्रामिण भागातील शेतमजूरांना रोजगार मिळवून देण्याचे माध्यम आहे. शेती व्यवसायाकडे एक उद्योग म्हणून पाहण्यात यावे. शेतीचा एक उद्योग म्हणून विकास होत असेल तर शेती व्यवसायाशी निगडीत असलेल्या सर्व घटकांवर त्याचा परिणाम होईल.शेतीचा विकास झाल्यास शेतकरी समृध्द होईल पर्यायाने देशाची अर्थव्यवस्था देखिल समृध्द होईल. ग्रामिण भागात आर्थिक परीवर्तन घडून येतील. गामिण भागातुन रोजगारासाठी मोठया प्रमाणावर होणारे स्थलांतरे थांबतील. शेती क्षेत्रामध्ये लोकांना व्यवसाय उपलब्ध करून देण्याची क्षमता आहे. त्यांचा योग्य त्या पध्दतीने विकास होणे गरजेचे आहे.

शेतीला उद्योगाचा दर्जा देण्यात आल्यास देशात उद्योगधंदयाला ज्याप्रमाणे काही सोयीसवलती प्राप्त होतात त्या सोयी शेतीला देखिल देण्यात येईल एवढेच नव्हे तर उद्योगधंदे ज्याप्रमाणे आपल्या उत्पादीत मालाची किमंती निर्धारीत करतात त्याचप्रमाणे शेतीच्या उत्पादीत मालाची किमंती शेतकारी निर्धारीत करेल

म्हणजे शेतकऱ्याना आपल्या शेतीउत्पादीत मालाच्या भावाकरीता कोणत्याही प्रकारचे त्यांना आंदोलने करावी लागणार नाही. शेतीव्यवसायामकरीता नवनविन तंत्रज्ञानाचा मोठयाप्रमाणात वापर करण्यात येवून याक्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध होतील.

**बाबासाहेबांनी मांडलेले शेतीविषयक प्रश्न :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय शेती संदर्भात असल्या काही प्रश्नाबाबत चर्चा केलेली आहे. भारतातील शेती ही निसर्गच्या लहरीवर अवलंबून आहे. काही भागात अती पाउस तर काही भागामध्ये कोरडा दुष्काळ पडतो. प्रामुख्याने उत्तरभारतामध्ये बारमाई वाहणाऱ्या नदया आहेत. या या नदयामध्ये जास्त पाउस झाला की पूरामुळे पिकाचे नुकसान होते. तर दक्षिण भारतातील नदया हया कोरडया पडतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात ही हा दुष्काळ मानव निर्मीत आहे. शेती व्यवसाय करण्याकरीता जमिन आणि पाणि हे दोन घटक अत्यंत महत्वाचे आहे. या दोन घटकाशिवाय शेतीचा विकास अशक्य आहे. भारतात पाण्याचा दुष्काळ आणि शेतजमीनीच्या लहान – लहान तुकडयाचीसमस्या मोठया प्रमाणावर आहे. पाण्याशिवाय शेती विकास अशक्य आहे. शेतीची उत्पादकता वाढवायची असेल तर शेतीला शाश्वत पाणी मिळणे गरजेचे आहे. ही बाब त्यांनी ब्रिटीश सरकारच्या लक्षात आणून दिली होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यानी आपल्या Small Holding in India and their remedies या शोधनिबंधामध्ये देशातील शेतीसमोरील प्रश्नांची चर्चा करतांना देशामध्ये प्रत्येकजन आपल्या नावाने शेतीचा सातबारा असावा म्हणून धडपडत असतांना, संयुक्त कुटूंबाचे विभाजन आणि वाढत्या लोकसंख्येमुळे शेतीचे तुकडीकरण होवून धारण क्षेत्र लहान झाल्यामुळे शेतीची जमीन मोठया प्रमाणात पडीत राहत आहे. उपजावू असणारी शेतीची जमीन बांधामध्ये गुंतल्या गेली आहे. त्यामुळे शेतीचे उत्पादन कमी झाले आणि देशात अन्नधान्याची समस्या आणि दारिद्रयाची समस्या वाढीस लागली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेतीच्या प्रश्नाबाबत चर्चा करतांना देशामध्ये इतर उद्योगधंदयांचा विकास न झाल्यामुळे कामास लागणाऱ्या श्रमशक्ती पेक्षा अधिक श्रमशक्ती काम करीत असल्यामुळे देखील शेती व्यवसायावर अधिक भार आलेला आहे. शेती व्यवसायात गुंतलेली ही अतिरीक्त श्रमशक्ती किंवा सरपल्स श्रमशक्ती काम करीत असल्यामुळे देखिल दारिद्रयाची समस्या वाढीस लागते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेती आणि शेतकऱ्यांचा अभ्यास करतांना भारतातील शेतकरी हा व्यापारी आणि सावकार लोकांच्या कर्जामध्ये अडकला आहे. सरकारकडून पूरेशे आर्थिक पाठबळ मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांना नाईलाजास्तव अधिक व्याजदराने सावकाराकडून कर्ज घ्यावे लागते. आणि या कर्जातुन त्यांची शेवटपर्यत सुटका होत नाही. सावकार आणि खोत यांना ते 'आयत्या बिळावरील नागोबा' असे म्हणतात.

डॉ बाबासाहेब आंबेडकर जमीन महसूलाबाबत विचार व्यक्त करतांना अशी भूमिका घेतात की आयकर भरणा हा व्यक्तीच्या उत्पन्नाच्या आधारावर निर्धारीत होतो. मात्र शेतीबाबत अशी व्यवस्था नाही दुष्काळामुळे उत्पन्न कमी झाले काय, किंवा भरघोष उत्पन्न झाले काय, प्रत्येक शेतकऱ्याला शेतसाऱ्या

बाबत एकच नियम लागू होतो. मग तो शेतकरी हा अल्पभूधारक असो की जहांगीरदार. अशा महसूलबाबतच्या धोरणामूळे शेतकऱ्याचे शोषण होते. आर्थिक विषमतेला खतपाणी घातले जाते.

शेतीबाबत च्या प्रश्नाबाबत चर्चा करतांना कोकणामध्ये असलेल्या खोत पध्दती देखील शेतकऱ्यांच्या शोषणास कारणीभूत अशी व्यवस्था आहे. प्रामुख्याने कोकण भागात ही पध्दती आहे. खोत हे पेशव्याच्या काळापासून एक सरकारी वतन आहे. सरकारी सारा वसूल करणे आणि ते सरकारी दरबारात जमा करणे हे त्यांचे प्रमुख कार्य होते. गावामध्ये किंवा गावालगत कसण्यायोग्य असलेली जमीन कुळे कसत होती या जमिनीवर खोत आपला मालकीहक्क सागुन शेतकऱ्यांच्या अशिक्षितपणाचा फायदा घेत त्यांव्याकडून 'कबुलायत' लिहून घेत होता. कबुलायत म्हणजे जमीनीची अकरा महिन्याची भाडेपट्टीच होती. त्यामध्ये विशिष्ट जमीन कसण्याचा मोबदल्यामध्ये विशिष्ट मक्ता निश्चित केला जाई आणि हा मक्ता त्या वर्षी देवू न शकल्यास जर त्याच्या दिडपटीने ता पूढच्या वर्षी सक्तीने वसुल केल जाई कुळानी निट वसुली दिली नाही तर प्रसंगी कुळातील संपूर्ण कुटुंबाला गुलाम म्हणून वागविले जाई. म्हणजेच शेतकऱ्याच्या शोषणाची ही एक पध्दती होती. प्रत्यक्ष शेतीमधील उत्पादन करून देखिल कुळाला त्याचा कोणताही फायदा मिळत नव्हत

**बाबासाहेबांनी शेतीच्या प्रश्नांबाबत सूचविलेले उपाय आणि केलेले कार्य :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कृषी बाबतच्या प्रश्नांचीच चर्चा केलेली नाही तर या समस्या सोडविण्यासाठी काही उपाय सूचविलेले आहे एवढेच नव्हे तर त्या साठी प्रत्यक्ष कार्य देखिल केलेले आहे. दुष्काळ हा मानवनिर्मीत आहे. आम्हाला शेतीला शाश्वत पाणिपूरवठा करायचा असेल तर पावसाळयामध्ये पडणाऱ्या पावसाचे नियोजन करणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर केन्द्रिय पाटबंधारे मंत्री (१९४२ ते १९४६)असतांना दामोदर बहुउद्देशिय प्रकल्पाची सुरूवात केली. नदी जोडण्याचा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवत असतांना भाक्रा – नांगल प्रकल्पाची पायाभरणी केली. दामोदर, गंगा, महानदी कोसी व ब्रम्हपुत्रा या सारख्या नदयावंर धरणे बाधण्याचा आणि विज निमिर्तीचा प्रकल्प हाती घेतला. शेतीच्या विकासाकरीता पाणी आणि अमर्यादित विज पुरवठयाची गरज त्यांनी व्यक्त केली व त्यांनी प्रथमच प्रादेशिक पॉवरग्रीड ची संकल्पना मांडली. सरकाने उर्जा प्रकल्प राबवावे अशी आग्रही भूमिका त्यांनी वेळोवेळी आपल्या भाषणातुन व्यक्त केलेली दिसून येते.

लहान भूमी धारण आणि शेतकऱ्यांना हमी भाव या सारख्या प्रश्नाची चर्चा करतांना त्याबाबत उपाययोजना देखिल सूचवित असतांना त्यांनी 'शेतीचे राष्ट्रीयकरण' ची संकल्पना मांडली. ते म्हणतात शासनाने शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेवून त्या विकसीत कराव्या. अशा विकसीत शेतजमीनी शेतकऱ्यांना काही अटीवर कसण्याकरीता दयाव्यात. हा एका अर्थाने सामुदायीक शेतीचाच प्रयोग होता. अशी शेती करण्याकरीता शासनाने अधिनियम बनवावे, पीक पध्दती, पाणि उपलब्धता, बांधबध्दस्ती, उत्पादकता वाढ, साठवणूक व्यवस्था, शेतमालाची विक्री, शेतमालाचा भाव याबाबत स्पष्ट नियम करावे. यामुळे कोणत्याही एका पिकाखाली मोठे क्षेत्र येवून शेतमालाबाबत विषमता येणार नाही. मागणी व पुरवठा या अर्थशास्त्रीय नियमानुसार शेतमालाला रास्त भाव मिळेल अतिरिक्त उत्पादनामुळे शेतमालाचे नुकसान

होणार नाही. वर्तमान काळात शेतकऱ्यांना शेतमालाच्या भावाकरीता झगडावे लागते या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीबाबत अधिनियम आणि कायदा ही संकल्पना किती महत्वाची होती हे लक्षात येते.

खोत विरोधी असलेला हा चरी संप १९३३ ते १९३९ पर्यत चालला. १९३४ मध्ये भरविण्यात आलेल्या शेतकरी परिषदेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यानी स्वतंत्र मजदुर पक्षाच्या १४ आमदाराच्या पाठींब्यावर १७ सप्टे १९३९ रोजी खोत पध्दती बंद करण्याचे विधेयक मुंबई विधिमंडळात मांडले त्यांनतर सरकारला जाग येवून मोरारजी देसाई याना सरकारच्या वतीने मोर्चेकरांना भेटावयास पाठविले. या चर्चेनुसार १९३९ साली सरकारने कुळांना सरंक्षण देण्याची घोषणा केली. यावेळीपासून कसेल त्याची शेती हे तत्व अस्तित्वात आले. जमिनीवर करणारी कायदेशीर कुळांची नावे सातबारामध्ये आणि इतर हक्कात नोंदविण्यात आली आणि यातुनच कुळ कायदा अस्तित्वात आला.

**निष्कर्ष :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना समजुन घेतांना त्यांचे विचार आणि कृती ही समाजातील असमानता नष्ट कशी होती आणि समाजात आर्थिक, सामाजिक, राजकिय समानता प्रस्थापीत करण्याची होती. समाजात असलेली सामाजिक विषमता ही आर्थिक विषमतेचा परिणाम असुन समाजात आर्थिक समानता प्रस्थापीत झाल्यास जातीव्यवस्थेद्वारा निर्माण होणारी विषमता काही प्रमाणामध्ये कमी होवू शकते. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा हा शेती व्यवसाय आहे आणि त्यामुळे हया व्यवसायाला विकसीत करणे गरजेचे आहे. त्यांनी कुळांना खोतीदारी पध्दतीतुन मुक्त करण्यासाठी प्रयत्न करून कसेल त्यांची शेती व कुळांना सातबारा देवून जमिनदाराच्या शोषणातुन मुक्त केले.

शेती व्यवसायाला शाश्वत पाणि आणि विद्युत हयाची गरज आहे आणि ते लोकाना कसे उपलब्ध करून देता येईल या साठी विचारच नव्हे तर दामोदर बहुउद्देशिय प्रकल्पाची सुरूवात केली. शेतकऱ्याना वर्तमानकाळात आपल्या हमी भावाकरीता करावा लागणारा संघर्ष आणि मोठया प्रमाणात उत्पादन झाल्यास शेतमालाचे होणारे नुकसान याकरीता त्यांनी मांडलेली शेतीचे राष्ट्रीयकरणाची संकल्पना त्यांच्या दुरदर्शी पणाची साक्ष देते.

**संदर्भ साधने :**

१. Small Holding in India and their remedies : Dr. B. R. Ambedkar
२. डॉ. बाबासाहेबाची भाषणे खंड १७ महाराष्ट्र राज्य शासन प्रकाशीत
३. Dr. B. R. Ambedkar Speeches in Bombay Legislative Assembly Debates 1927
४. Dr. B. R. Ambedkar Role in Economics Planning, Water and power Policy : Shukdev THorat] Shipra Publication 2018
५. Dr. B. R. Ambedkar Role in Economics Planning, Water Policy : Shukdev Thorat] Shipra Publication 2019
६. बोल महामानवाचे : नरेन्द्र जाधव (संपा) खंड ३
७. द वायर मराठी thewire.in